**प्रेस नोट दि. 05/06/2020**

**गुन्हे शाखा, युनिट 5 ची कारवाई**

विक्री करण्याकरीता देशी बनावटीचे पिस्टल व जिवंत काडतुस बाळगणाऱ्या इसमास अटक अटक आरोपींकडुन 03 देशी बनावटीचे पिस्टल व 06 जिवंत काडतुसे असा एकुण 1,59,000/- चा मुद्देमाल जप्त

आज रोजी मा वरिष्ठांचे आदेशान्वये वटपोर्णिमेचे सणाचे अनुशंगाने सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे व गुन्हे शाखा, युनिट 5 कडील पोलीस कर्मचारी हे खासगी चारचाकी वाहनाने पेट्रोलींग करीत असताना पोलीस कर्मचारी दत्तात्रय बनसुडे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक इसम सोमाटणे फाटा येथे देशी बनावटीचे पिस्टल विक्रीकरीता घेवून येणार आहेत. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे यांनी सोबतचे कर्मचारी यांना सुचना देवून त्यांच्या दोन टिम तयार करुन सापळा लावला. काही वेळाने मिळालेल्या माहितीप्रमाणे एक इसम रिक्षा मधुन उतरुन उतरुन सोमाटणे फाटा येथे रोडचे कडेला जावून कोणाचीतरी वाट पाहत थांबलेला दिसुन आला. त्याचे हातामध्ये एक पांढरे रंगाची कापडी पिशवी असल्याचे दिसुन आले त्याला पोलीसांचा सुगावा लागताच त्याने पळुन जाण्याचा प्रयत्न केला असता त्याला पोलीस स्टाफचे मदतीने शिताफीने ताब्यात घेवून नाव व पत्ते विचारले असता त्याने त्याचे नाव सचिन महादेव जाधव, वय 26 वर्षे धंदा मजुरी रा मु.पो. खडखडवाडी ता कोरेगाव जि सातारा असे असल्याचे सांगितले. त्यांची पंचांसमक्ष झडती घेतली असता त्याचे कमरेस डावे बाजुस पॅन्टमध्ये खोचलेले एक देशी बनावटीचे काळे रंगाचे गावठी पिस्टल मॅक्झीनसह मिळुन आले तर त्याचे पॅन्टचे डावे खिशामध्ये 06 जिवंत काडतूसे मिळुन आली त्याचे ताब्यातील पांढरे रंगाचे पिशवीची तपासणी करता त्यामध्ये 02 पांढरे रंगाची देशी बनावटीचे पिस्टल असे एकुण 03 देशी बनावटीचे पिस्टल व 06 जिवंत काडतुसे किंमत रुपये 1,59,000/- चा मुद्देमाल मिळुन आला. मिळुन आलेले पिस्टल व जिवंत काडतुस जवळ बाळगण्याचा परवाना आहे अगर कसे या बाबत विचारणा केली असता त्यांनी प्रथम उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली त्यांस गुन्हे शाखा, युनिट 5 कार्यालय येथे नेवून सखोल तपास करता त्याने त्याचेकडे कोणत्याही प्रकारचा अग्निशस्त्र बाळगण्याचा परवाना नसल्याचे सांगुन सदर पिस्टल व जिवंत काडतुस हि त्याचे ओळखीचे मध्यप्रदेश येथील एका व्यक्तीकडुन विक्री करण्याकरीता आणल्याचे सांगितले.

सदर आरोपीवर तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन येथे भारतीय शस्त्र अधिनियम 1959 चे कलम 3(25) सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 37 (1) (3) सह 135 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन दाखल गुन्हयाचा पुढील तपास सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे, गुन्हे शाखा, युनिट 5 हे करीत आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुकत, मा. श्री सुधिर हिरेमठ व मा. श्री विनायक ढाकणे, सहा पोलीस आयुक्त गुन्हे मा. श्री राजाराम पाटील यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा, युनिट-5 चे पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत, सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे व पोलीस कर्मचारी दत्तात्रय बनसुडे, धनराज किरनाळे, मयुर वाडकर, ज्ञानेश्वर गाडेकर, धनंजय भोसले, शामसुंदर गुट्टे, संदिप ठाकरे, गणेश मालुसरे, सावन राठोड, फारुक मुल्ला, दयानंद खेडकर, स्वामीनाथ जाधव, भरत माने, नितीन बहिरट, राजकुमार इघारे, गोपाळ ब्रम्हांदे, राजेंद्र शेटे, राजेंद्र कदम व नागेश माळी यांनी केली आहे.


गुन्हे शाखा, युनिट ५
पिंपरी चिंचवड आयुक्तालय
गुन्हे शाखा, युनिट-५.
पिंपरी-चिंचवड.